# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. सर्वसाधारण सभा दिनांक 20 /08/2019

## सभा सुचना क्रं. 4 सायं 4.30 वा.

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/०७/२०१९ रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव. | **ठराव :-** मागील सर्वसाधारण सभा दि. 19/07/2019 रोजीचे कायम केलेले इतिवृत्त दुरूस्तीसह मंजूर करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- (रमेश घोरकना) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| 2. | प्रश्नोत्तरे | निरंक |
| 3. | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव | |
| 4. | श्री. महेश सदू किणी यांना वारसाहक्काने सफाई कामगार पदावर नियुक्त करणेबाबत. | **निर्णय/ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती -सी, चंदनसार, विरार विभाग आस्थापनेवरील कर्मचारी श्री. सदू किणी, सफाई कामगार हे दिनांक 31/05/2019 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले असुन त्यांचा मुलगा श्री. महेश सदू किणी हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक 21 ऑक्टोबर, 2011, शासन परिपत्रक दिनांक 26 फेब्रुवारी, 2014 व शासन निर्णय दिनांक 11 मार्च, 2016 मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (यज्ञेश्वर पाटील ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा** (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 5. | श्री. अजित विष्णू देसक यांना वारसाहक्काने सफाई कामगार पदावर नियुक्त करणेबाबत. | **निर्णय/ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती -सी, चंदनसार, विरार विभाग आस्थापनेवरील कर्मचारी श्री. विष्णु देसक सफाई कामगार हे दिनांक 31/05/2019 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले असुन त्यांचा मुलगा श्री. अजित विष्णु देसक हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक 21 ऑक्टोबर, 2011, शासन परिपत्रक दिनांक 26 फेब्रुवारी, 2014 व शासन निर्णय दिनांक 11 मार्च, 2016 |

| | | |
|---|---|---|
| | | मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (यज्ञेश्वर पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 6. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती "आय", वसई आस्थापनेवरील कर्मचारी श्री. संदीप बारक्या भुरकुंड, सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देण्याबाबत. | **ठराव/निर्णय** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्री.संदीप बारक्या भुरकुड, सफाई कामगार यांनी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्ती मिळणेबाबत विनंती केली आहे. श्री.संदीप बारक्या भुरकुड यांची 20 वर्षाची अर्हताकारी सेवा पुर्ण झाली असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील नियम 66(1) नुसार त्यांची स्वेच्छानिवृत्तीची नोटीस स्विकारुन नोटीसीस तीन महिने पुर्ण झालेनंतर दिनांक 12/09/2019 रोजी मध्यान्होत्तर त्यांना महानगरपालिका सेवेतुन स्वेच्छानिवृत्त करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच श्री.संदीप बारक्या भुरकुड यांना स्वेच्छानिवृत्तीनंतरचे देय असलेले अनुषंगिक लाभ अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे.<br>**अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 7. | श्री. नितीन दिनेश बारीया यांना लाड समिती शिफारशी नुसार महानगरपालिका सेवेत सफाई कामगार या पदावर सामावून घेणेबाबत. | **निर्णय/ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई आस्थापनेवरील कर्मचारी श्रीमती मंजू दिनेश बारीया, सफाई कामगार हया दिनांक 31/04/2019 रोजी नियत वयोमानानुसार महानगरपालिका सेवेतून सेवानिवृत्त झाले असुन त्यांचा मुलगा श्री. नितीन दिनेश बारीया (वय 33 वर्षे ) हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक 21 ऑक्टोबर, 2011, शासन परिपत्रक दिनांक 26 फेब्रुवारी, 2014 व शासन निर्णय दिनांक 11 मार्च, 2016 मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (यज्ञेश्वर पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 8. | श्री. राजेश परुळेकर, लिपीक यांची २० वर्षे सेवा पूर्ण झाल्याने त्यांना स्वेच्छा निवृत्ती मिळणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती-ई नालासोपारा येथील कर्मचारी श्री. राजेश परुळेकर, लिपीक यांनी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्ती मिळणेबाबत विनंती केली आहे. श्री. राजेश परुळेकर, यांची 20 वर्षाची अर्हताकारी सेवा पुर्ण झाली असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील नियम 66(1) नुसार त्यांची दि.21/11/2014 ची स्वेच्छा निवृत्तीची नोटीस स्विकारुन त्यांना दिनांक 21/11/2014 रोजी |

| | | |
|---|---|---|
| | | पुर्व लक्षी प्रभावाने मध्यान्होत्तर त्यांना महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्त करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच श्री. राजेश परुळेकर, लिपीक यांना स्वेच्छानिवृत्तीनंतरचे देय असलले अनुषांगिक लाभ अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे.<br>**अनुमोदक :- (अतुल सांळुंखे) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 9. | <u>श्रीमती अर्चना हुदळीकर, सफाई कामगार यांची वारस मुलगी श्रीमती मोनाली अनिरुध्द हुदळीकर यांना वारसा हक्काने सफाई कामगार पदावर सामावून घेणेबाबत.</u> | **निर्णय/ठराव:-** श्रीमती अर्चना हुदळीकर यांचे सेवापुस्तकातील तत्कालीन मुख्याधिकारी यांनी लाल शाईने घेतलेली नोंद ही दि. 16 मे, 2005 च्या स्थायी निदेशाचे अनुषंगाने घेतली आहे. सदरच्या नोंदी नुसार त्यांना वारसा हक्काचा लाभ देणेस बाधा येत आहे. त्यामुळे सदरची सेवा पुस्तकाची नोंद रद्द करुन श्रीमती हुदळीकर यांना वारसाहक्काचा लाभ मिळणे व वारसाहक्काचा लाभ मिळणेकामीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस आजची ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रविण शेट्टी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 10. | <u>वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "जी" कार्यक्षेत्रातील वॉर्ड नं. १०५ मध्ये जुचंद्र येथे जुचंद्र नायगांव मुख्य रस्ता ते म्हात्रेवाडी रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.</u> | **ठराव** :- वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली सदर कामाकरीता बी/1 प्रकारची ई-निविदा मागविण्यास तसेच सदर कामाच्या रक्कम रु. 1,31,41,058/- च्या अंदाजपत्रकास हि सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. या कामी निविदा दर मागविण्यात यावेत असे हि सभा ठरवीते.<br>**अनुमोदक :- (कन्हैय्या भोईर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 11. | <u>वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती अे (बोळींज) हद्दीतील उद्याने सुशोभिकरण करणे.</u> | **ठराव** :- प्रभाग समिती अे बोळींज हद्दीतील उद्याने सुशोभिकरणाचा प्रस्ताव अे प्रभाग समितीच्या शिफारशी नुसार सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात यावा अशी ही सर्वसाधारण सभा ठरवित असुन तुर्तास सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवावा अशी सभा ठरवीत आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज ठाकूर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 12. | <u>वसई विरार शहर महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापना अंतर्गत **Digital Mobile**</u> | **प्रस्तावाचा ठराव /निर्णय :-** सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. याकामी रक्कम रु. 2 कोटी इतक्या खर्चास व ई निविदा प्रक्रिया राबवून एजन्सी निश्चत करुन सदरचे काम करण्यास ही सभा प्रशासकीय व |

| | | |
|---|---|---|
| | Radio तंत्रज्ञानावर आधारीत बिनतारी संदेश यंत्रणा (Wireless Communication System) स्थापन करणेबाबत. | वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 13. | प्रभाग समिती "आय" कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. ११३ मध्ये सुरुची बाग येथे वॉक वे बनविणे व इतर कामे करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. वरील कामी तयार करणेत आलेल्या रु. 83,43,969/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यकता तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस मा.आयुक्त हयांनी मा. सर्वसाधारण सभेपुढे शिफारस केली आहे. तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (अफीफ शेख)सुचक:- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे))**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 14. | प्रभाग समिती "एफ" धानिव / पेल्हार क्षेत्रातील वालईपाडा गावा अंतर्गत आर.सी.सी नाला बांधणे. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक बाधक चर्चा करण्यात आली. त्यानुसार सदर काम करणेस व सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. 2,98,71,622/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामी विहीत प्रणालीनुसार निविदा मागविणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 15. | अल्पसंख्यांक बहूल क्षेत्रीय विकास कार्यक्रम सन २०१५-१६, सन २०१६-१७, सन २०१७-१८, सन २०१८-१९ अंतर्गत प्रस्तावीत कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत. | **ठराव :-** सदर योजनेअंतर्गत वरीलप्रमाणे कामांना प्रशासकीय वित्तीय मान्यता देणेत येत असून मंजूर अनुदाना व्यतिरिक्त होणारा खर्च महानगरपालिका फंडातुन करण्यास ही सभा मान्यता देते आहे. व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे निविदा मागविण्यात याव्यात असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 16. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील दवाखाने/रुग्णालये/शुश्रूषागृहे/ प्रसुतीगृहे यांची नोंदणी / नुतनीकरण महानगरपालिकेकडे अनिवार्य करणे व सद्यस्थितीत आकारण्यात येणाऱ्या | **ठराव / निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील दवाखाने/रुग्णालये/शुश्रूषागृहे/प्रसुतीगृहे यांची नोंदणी/नुतनीकरण महानगरपालिकेकडे अनिवार्य करणे व सद्यस्थितीत आकारण्यांत येणाऱ्या नोंदणी/नुतनीकरण शुल्क ची पुन:निश्चिती करणेकामी निर्णय होणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रात बॉम्बे नर्सिंग होम |

| | | |
|---|---|---|
| | **नोंदणी/नुतनीकरण शुल्कची पुन: निश्चिती करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.** | रजिस्ट्रेशन ऍक्ट 1949 अन्वये रुग्णालयाच्या नवीन नोंदणी/नुतनीकरण महानगरपालिकेकडे करणे आवश्यक असुन नोंदणी/नुतनीकरण शुल्क खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे रुग्णालयातील खाटांच्या संख्येनुसार महानगरपालिकेने आकारणे आवश्यक आहे. |

| अ.क्र. | रुग्णालयातील खाटा | नोंदणी फी | नुतनीकरण फी (एक वर्षाकरीता) | नुतनीकरण फी (3 वर्षाकरीता) ५% सूट |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 ते 5 | 1500/- | 1500/- | 4275/- |
| 2 | 6 ते 10 | 2000/- | 2000/- | 5700/- |
| 3 | 11 ते 15 | 3000/- | 3000/- | 8550/- |
| 4 | 16 ते 20 | 6000/- | 6000/- | 17100/- |
| 5 | 21 ते 25 | 15000/- | 15000/- | 42750/- |
| 6 | 26 ते 50 | 30000/- | 30000/- | 85500/- |
| 7 | 51 ते 100 | 60000/- | 60000/- | 171000/- |
| 8 | 101 ते 150 | 75000/- | 75000/- | 213750/- |
| 9 | 151 ते 200 | 90000/- | 90000/- | 256500/- |
| 10 | 201 पासुन पुढे | 100000/- | 100000/- | 285000/- |

खाजगी दवाखाने, पॅथॉलॉजीकल लेबॉरेटरी, डायग्नोस्टिक सेंटर, पॉलिक्लिनिक, डेंन्टल क्लिनिक, ब्लड बँक, एक्स-रे/सोनोग्राफी सेंटर, सिटी/एम.आर.आय. सेंटर यांची नोंदणी व नुतनीकरणाकरीता आकारण्यांत येणाऱ्या शुल्कामध्ये कोणतेही प्रकारची वाढ करण्यात आलेली नसून ती पूर्वीप्रमाणेच नोंदणी/नुतनीकरण शुल्क खालील नमूद केल्याप्रमाणे आकारण्यांत यावी.

| अ.क्र. | नोंदणी फी | नुतनीकरण फी (3 वर्षाकरीता) |
|---|---|---|
| 1 | 1000/- | 3000/- |

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दवाखाने/रुग्णालये/शुश्रृषागृहे/प्रसुतीगृहे यांची नोंदणी/नुतनीकरण महानगरपालिकेकडे अनिवार्य करणे व महानगरपालिकेकडे नोंदणी/नुतनीकरण करीता विलंब करणाऱ्या रुग्णालये यांना नोंदणी/नुतनीकरण करता विलंब केलेबाबत प्रति दिन रु.50/- इतकी रक्कम दंड म्हणून आकारण्यांस ही सभा

| | | |
|---|---|---|
| | | प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 17. | वसई विरार शहर महानगरपालिका ९ प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील उद्याने देखभालीकरीता कार्यरत असलेल्या महिला बचत गटास पुर्वलक्षी प्रभावाने देण्यात आलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मंजूरी देणे, उद्यान देखभाल कामाकरीता नव्याने स्वारस्य अभिरुची मागविणे व सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरीता होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेबाबत. | **ठराव/निर्णय:-** उपरोक्त प्रस्तावावर सभेत साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. प्रभाग समिती डी (आचोळे) मधील एव्हरशाईन सिटी स्मशानभुमी देखभालीकरीता रमाई महिला बचत गट ऐवजी जिजाई महिला बचत गट नियुकत करण्यांत आला आहे. सदर प्रस्तावात आलेला मुद्रणदोष दूर करून मान्यता देण्यात येत आहे.वसई-विरार शहर महानगरपालिका 9 प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील उद्यान देखभालीचे व रखरखावाचे काम प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे शहरातील नोंदणीकृत महिला बचत गटांना देण्यात आले असून सदर महिला बचत गटांना पूर्वलक्षी प्रभावाने मा.आयुक्त साहेब यांनी दि.01/04/2019 ते दि.30/09/2019 पर्यंत 6 महिने करीता देण्यांत आलेल्या मुदतवाढीच्या कार्योत्तर मंजुरीच्या प्रस्तावास ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.तसेच उद्याने देखभालीकामी नव्याने स्वारस्थ अभिरूची मागविणेत यावी व सदरची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत पूर्व कार्यरत असलेल्या महिला बचत गटांना मुदतवाढ देणेत यावी व सन 2019-20 करीता दि.31/03/2020 पर्यंत उद्यान देखभालीकामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (माया चौधरी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 18. | सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये महानगरपालिका हद्दीतील जि. प. शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार शैक्षणिक साहित्य वाटप करणे बाबत. | **निर्णय :-** सदरच्या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली असून महिला व बालकल्याण विभागाने शिफारस केल्यानुसार सन 2020-21 या वर्षा करिता जि.प शाळेतील विदयार्थ्यांना शैक्षणिक साहित्य दप्तर, 1 ली ते 4थी करिता रेनकोट, इयत्ता 5 वी ते 8 वी करिता छत्री,सॅडल,आईल पेस्टल कलर,सुंडन्टस पोस्टल कलर,कंपास बॉक्स,ड्राईंग बुक, पेन्सील ,प्लास्टीक स्केल,वही 80पृष्ठ 176 पृष्ठ इ. शैक्षणिक साहित्य वाटप करण्याम यावे सदरचा साहित्य वाटपासाठी होणा-या खर्च हा सन 2020-21 चा मंजूर होणा-या तरतूदीतुन करण्यात यावा.<br>सदरचे साहित्य वाटपा करिता महानगरपालिकेच्या वाहन विभागामार्फत वाहन उपलब्ध करुन दयावे.सदरचे साहित्य खरेदी करण्याकामी ई- निविदा प्रक्रिया करण्याकरिता व येणा-या अदांजे 2,50,00,000/- खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (माया चौधरी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 19 | सन २०१८-१९ ते सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दुभाजकांची देखभाल दुरुस्ती, | **ठराव/निर्णय:-** उपरोक्त विषयावर सभेमध्ये सविस्तर चर्चा करणेत आली. झालेल्या चर्चेनुसार शहरातील सर्व दुभाजकांची नावे व मोजमापे सबंधीत प्रभागातील मा.सभापती व मा.नगरसेवक यांना देण्यात यावी. तसेच प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे पूर्वी सुशोभिकरण केलेल्या दुभाजकांचे क्षेत्रफळ वाढले असून वाढलेल्या क्षेत्रफळानुसार माहे मे |

| | | |
|---|---|---|
| | संगोपन व नव्याने तयार होणाऱ्या दुभाजकांचे सुशोभिकरण करणेकामी मे. ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग यांना मंजूर दराने काम देणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत. | 2019 पर्यंत प्रदान केलेल्या देयकाप्रमाणे झालेल्या खर्चास व सन 2019-20 व सन 2020-21 या वित्तीय वर्षाकरीता होणाऱ्या रक्कम रु.2,85,94,036.8/- (अक्षरी- दोन कोटी पंच्याऐंशी लक्ष चौऱ्याण्णव हजार छत्तीस रूपये ऐंशी पैसे मात्र/-) इतक्या खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रशांत राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 20 | प्रभाग समिती "आय" कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. १०३ मध्ये भुईगांव बुद्रुक येथे शेबारवाडी नाका ते जसोडी उघाडी पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली वरील कामी तयार करणेत आलेल्या रु.77,18,644/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज चोरघे) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 21 | प्रभाग समिती "अ" मधील विरार (प) प्रभाग क्र. १५ मध्ये पुरापाडा मैदानाच्यामध्ये माती भराव करणे व कंपाऊंड बांधणे याकामी प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रु.2,13,67,025/-) या खर्चास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी ई-निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- (अजीत नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 22 | प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) येथील प्रभाग क्र. ३७ मधील साई दया अपा. ते अष्टविनायक अपा. ते सॉलेटीअर अपा. जवळील मुख्य नाल्यापर्यंत रस्त्यालगत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामाच्या रु. 1,04,94,506/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा मंजूरी देत आहे व तसेच पुढील आवश्यकता निविदा कार्यवाही मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (भरत मकवाना) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 23 | प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) रेल्वे प्लॅटफॉर्म क्र. ०४ ते प्रगतीनगर येथे रेल्वे समांतर (पूर्वेकडे) आर.सी.सी. नाला बांधणे कामास सुधारीत प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय** :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद केलेल्या प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) रेल्वे प्लॅटफॉर्म क्र. 04 ते प्रगतीनगर येथे रेल्वे समांतर (पूर्वेकडे) आर.सी.सी. नाला बांधणे कामाच्या रक्कम रु.41,24,71,934/- इतक्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदर कामाचा पुर्ण करण्याचा कालावधी 6 महिन्यांऐवजी 18 महिने करण्यासाठी ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 24 | **स्वच्छता निरीक्षक व अभियंता (ठेका) यांचे इंधन भत्त्याबाबत.** | **ठराव /निर्णय :-** सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन करुन त्यावर साधक- बाधक चर्चा करण्यात आली त्यामध्ये अग्निशमन विभाग अभियंते वगळून पाणीपुरवठा विभाग अभियंते, वाहन विभाग अभियंते, घनकचरा व्यवस्थापन व मलनिस्सारण विभाग अभियंते यांना भत्ता रु.3000/- प्रतिमाहे पूर्वलक्षीप्रभावाने (माहे नोव्हेंबर 2018 पासून ) अदा करण्यास हि सभा सर्वानुमत्ते मंजूरी प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :- (रमेश घोरकना) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 25 | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचा मंजूर रिक्त पदांवर भरती करताना ठेक्यावरील कार्यरत अनुभवी कर्मचाऱ्यांची वयाची, शिक्षणाची व शारिरीक क्षमतेची अट शिथिल करणेबाबत.** | **निर्णय/ठराव:-** शासनाने अग्निशमन विभागासाठी प्रारुप सेवा प्रवेश नियम तयार करून शासनाकडे पाठविलेले आहेत. तसेच नवि मुंबई महानगरपालिकेचे सेवा प्रवेश नियम तयार केलेले आहेत. सद्या वसई विरार शहर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागातील रिक्त पदे सरळसेवेने भरणे प्रस्तावित आहे. सदर वेळी आकृतीबंधातील अग्निशमन विभागाची विविध संवर्गातील मंजूर रिक्त पदांवर सरळसेवेने नियुक्ती करताना सद्याच्या ठेक्यातील अग्निशमन सेवेत कार्यरत असलेले अग्निशामक व चालक यंत्रचालक यांना सरळसेवेने भरती करतांना त्यांचे वयोमार्यदेत शैक्षणिक अर्हता व शारिरीक क्षमतेची अट शिथिल करणे आवश्यक आहे. ठेक्यावरील अनुभवी अग्निशामक व चालक यंत्रचालक यांना नियुक्ती दिल्यास महानगरपालिकेचे काही नुकसान होणार नाही. त्यांचे अनुभवाचा फायदाच होईल तसेच अग्निशमन सेवेतील सर्व संवर्ग हे तांत्रिक संवर्ग असुन सदर संवर्गातील कर्मचारी प्रशिक्षीत, अनुभवी असणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या अग्निशमन ठेक्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची वयोमर्यादा शिथिल केल्यास महानगरपालिकेला प्रशिक्षीत, अनुभवी व स्थानिक परिस्थितीत उत्तम माहिती असलेले कर्मचारी उपलब्ध होऊ शकेल व त्यांचा फायदा महानगरपालिकेस होईल. या उलट नविन विना अनुभवी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याऐवजी सद्याच्या अनुभवी ठेका कर्मचाऱ्यांना वयोमर्यादा, शारिरीक क्षमता व शैक्षणिक अर्हता शिथिल केल्यास ते सरळसेवा भरती प्रक्रियेत भाग घेवू शकतील व महानगरपालिकेस प्रशिक्षीत व अनुभवी फायरमन व चालक यंत्रचालक, अग्निशमन केंद्र अधिकारी व उप अग्निशमन केंद्र अधिकारी उपलब्ध होतील.यासंदर्भात निदर्शनास आणण्यात येते की, ज्यावेळी शासन सेवा सरळसेवा प्रवेश नियम खुल्या प्रवर्गासाठी वयोमर्यादा 33 वर्षे होती व मागास वर्गीयांसाठी 38 वर्षे होती त्यावेळेस महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एपिटी-2014/प्र.क्र.-224/आस्था-7, दि. 21 ऑक्टोबर, 2014 अन्वये सरळसेवा भरती प्रक्रीया राबविणेसाठी राष्ट्रीय हिवताप प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून प्रत्येक वर्षी 90 दिवस कार्यरत असलेल्या हंगामी क्षेत्र कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा 30 वर्षावरून 45 वर्षापर्यंत शिथिल करण्यात आली आहे. सबब शासनाचे सामान्य प्रशासन विभागाच्या दि. 25 एप्रिल, 2016 च्या शासन निर्णयाचे अनुपालन करण्यात यावे व त्यासाठी उपरोक्त ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णयाचे धर्तीवर वसई विरार शहर महानगरपालिकेतील ठेक्यावरील किमान 5 वर्षे अनुभव असलेल्या अग्निशमन कर्मचाऱ्यांसाठी वयोमर्यादा 45 वयापर्यंत वाढविणेस व शारिरीक अर्हता शिथिल करणेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस आजची मा. महासभा मंजूरी देत आहे. |

| अनु. क्र. | पदांचे नाव | शासनाने प्रस्तावित केलेले शारिरीक पात्रतेचे व वयाचे सेवा प्रवेश नियम | मा.महासभेने शिथील केलेली शारिरीक पात्रता व वय |
|---|---|---|---|
| 1 | अग्निशमन केंद्र अधिकारी (गट - क) | <u>शारिरीक पात्रता</u> :-<br>अ) उंची - 165 से.मी. (महिला उमेदवारांसाठी उंची 162 से.मी.)<br>ब) छाती - साधारण 81 सेमी- फुगवून 5 सेमी जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही) क) वजन - 50 कि.ग्रॅ.<br>ड) दृष्टी - चांगली | वयानुरूप शारिरीक पात्रतेत सुट देण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| | | वयोमर्यादा - 40 वर्षे | महानगरपालिकेत अग्निशमन विभागात 5 वर्षे किंवा व त्यापेक्षा अधिक काळ कार्यरत असलेल्या ठेका कर्मचाऱ्यांस 45 वर्षे पर्यंत वय शिथिल करणेची शिफारस करण्यात येत आहे. |
| 2 | अग्निशमन उप केंद्र अधिकारी (गट -क) | <u>शारिरीक पात्रता</u> :-<br>अ) उंची - 165 से.मी. (महिला उमेदवारांसाठी उंची 162 से.मी.)<br>ब) छाती - साधारण 81 सेमी- फुगवून 5 सेमी जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही)<br>क) वजन - 50 कि.ग्रॅ.<br>ड) दृष्टी - चांगली | वयानुरूप शारिरीक पात्रतेत सुट देण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| | | वयोमर्यादा - 35 वर्षे | महानगरपालिकेत अग्निशमन विभागात 5 वर्षे किंवा व त्यापेक्षा अधिक काळ कार्यरत असलेल्या ठेका कर्मचाऱ्यांस 45 वर्षे पर्यंत वय शिथिल करणेची शिफारस करण्यात येत आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 3 | प्रमुख अग्निशमक विमोचक (गट - क) | <u>शारिरीक पात्रता</u> :-<br>अ) उंची - 165 से.मी. (महिला उमेदवारांसाठी उंची 162 से.मी.)<br>ब) छाती - साधारण 81 सेमी- फुगवून 5 सेमी जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही)<br>क) वजन - 50 कि.ग्रॅ.<br>ड) दृष्टी - चांगली | वयानुरूप शारिरीक पात्रतेत सुट देण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| | | | | वयोमर्यादा - 30 वर्षे | महानगरपालिकेत अग्निशमन विभागात 5 वर्षे किंवा व त्यापेक्षा अधिक काळ कार्यरत असलेल्या ठेका कर्मचाऱ्यांस 45 वर्षे पर्यंत वय शिथिल करणेची शिफारस करण्यात येत आहे. |
| | | 4 | अग्निशामक - विमोचक (फायरमन) | <u>शारिरीक पात्रता</u> :-<br>अ) उंची - 165 से.मी. (महिला उमेदवारांसाठी उंची 162 से.मी.)<br>ब) छाती - साधारण 81 सेमी- फुगवून 5 सेमी जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही )<br>क) वजन - 50 कि.ग्रॅ.<br>ड) दृष्टी - चांगली | वयानुरूप शारिरीक पात्रतेत सुट देण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| | | | | वयोमर्यादा - 30 वर्षे | महानगरपालिकेत अग्निशमन विभागात 5 वर्षे किंवा व त्यापेक्षा अधिक काळ कार्यरत असलेल्या ठेका कर्मचाऱ्यांस 45 वर्षे पर्यंत वय शिथिल करणेची शिफारस करण्यात येत आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 5 | चालक-<br>यंत्रचालक<br>(गट -क) | अ) उंची - 165 से.मी. (महिला उमेदवारांसाठी उंची 162 से.मी.)<br>ब) छाती - साधारण 81 सेमी- फुगवून 5 सेमी जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही)<br>क) वजन - 50 कि.ग्रॅ.<br>ड) दृष्टी - चांगली | वयानुरूप शारिरीक पात्रतेत सुट देण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| | | | | वयोमर्यादा - 30 | महानगरपालिकेत अग्निशमन विभागात 5 वर्षे किंवा व त्यापेक्षा अधिक काळ कार्यरत असलेल्या ठेका कर्मचाऱ्यांस 45 वर्षे पर्यंत वय शिथिल करणेची शिफारस करण्यात येत आहे. |
| | | **अनुमोदक :- (प्रविण शेट्टी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** | | | |

**नगरसचिव**
**वसई विरारशहर महानगरपालिका**